संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# लाटलेला पैसा उलटूही शकतो

**पैसा** कमावणे आणि पैसा लाटणे या दोन गोष्टींमध्ये जमीन आसमानाचा फरक असतो. परंतु पैसा लाटल्यानंतरही तो कमावलेला आहे असा पैसा मिळवणाऱ्यांचे कर्तृत्व पैसा कमावणाऱ्यांपेक्षा जास्त मोठे असल्याचे चित्रही उभे केले जाते. अर्थातच सत्ता, अधिकार किंवा झुंडशाहीच्या जोरावर पैसा लाटता येतो. काहीवेळेला ज्यांच्याकडे आधीपासूनच प्रचंड पैसा असतो ते पुन्हा याच पैशाच्या जोरावर आणखी नवा पैसा लाटत राहातात. देशभरामध्ये अशी अनेक उदाहरणे जरी आहेतच त्यात आपला महाराष्ट्रही मागे नाही. स्वतःला तथाकथित कर्तृत्ववान म्हणवून घेणारे किंवा सत्ताधिकाराच्या जोरावर पैसा कमावून मालामाल होणारे जेव्हा अडचणीत येतात तेव्हा त्यांचे खरे स्वरुपही पुढे येते. लाटलेला पैसा हा केव्हा आणि कसा उलटेल हे सांगता येत नाही. हेच देशातल्या किंवा महाराष्ट्रातल्या काही उदाहरणांवरून पाहायला मिळते. अगदी अलिकडच्या उदाहरणांमध्ये सुब्रतो राय, विजय मल्ल्या, नीरव मोदी एवढेच कशाला अगदी कालपरवाचे उदाहरण द्यायचे तर अनिल अंबानी लोकमंगल नावाने अशीच पैशांची दंगल घडवणारे राज्याचे सहकार मंत्री सुभाष देशमुख अशी ही अलिकडची सलग उदाहरणे आहेत. खरे तर एकाच दिवशी आलेल्या तीन बातम्यांनी कोणाचेही लक्ष वेधले जाऊ शकते. नीरव मोदी यांच्यासोबत असलेल्या मेहुल चोक्सी याच्या थायलंडमधील फॅक्टरीला एन्फोर्समेंट डिपार्टमेंटने सील ठोकून पंधरा कोटी रुपये वसुलीची कारवाई सुरु केली. अनिल अंबानी यांनी एरिक्सन कंपनीचे ५५० कोटी रुपये थकवले. सर्वोच्च न्यायालयाचा या संदर्भात अवमान झाल्याने त्यांना अटक करण्याचा आदेश निघण्याची शक्यता आहे. तर राज्याचे सहकार मंत्री सुभाष देशमुख यांनी सेबीचे आदेश न पाळल्याने त्यांच्या लोकमंगलची खाती गोठवण्याची नोटीस जाहीर झाली.

### बँका आणि बड्यांचे हितसंबंध

हे सगळे व्यवहार हजारो कोटींच्या भाषेमध्ये असतात. नुसते आकडे पाहूनच सामान्य माणसांचे डोळे पांढरे होऊ शकतात. बड्या लोकांचे बडे व्यवहार आणि तितकेच मोठे बडे गैरव्यवहार अशी ही परंपरा वर्षानुवर्षे आपल्या देशात सुरु आहे. अन्यथा अब्जावधीची संपत्ती असताना पुन्हा बँकांकडून कर्जे घेऊन दहा हजार कोटीला चुना लावण्याचे धाडस विजय मल्ल्या करू शकला नसता. साधारणपणे व्यवसायामध्ये एका यशस्वी व्यवसायातून दुसरा व्यवसाय उभारता येईल एवढी क्षमता ठेवली जाते, परंतु गेल्या तीस चाळीस वर्षांत एक व्यवसाय यशस्वी झाल्याबरोबर अनेकांना पैशाची अशी हाव सुटते की एकाचवेळी दहा दहा व्यवसायांसाठी बँकांकडे अर्ज केले जातात आणि बँकाही त्यांच्या सत्ता, पैसा, अधिकारांच्या दबावापुढे ते मंजूरही करतात. अर्थातच बँक अधिकाऱ्यांना हाताशी धरून नीरव मोदी किंवा मेहुल चोक्सीने हाच उपद्व्याप केला आणि पंजाब नॅशनल बँकेला चौदा हजार कोटींना बुडवले. बँक अधिकाऱ्यांशी खुशामत केल्याशिवाय ही कामे होऊ शकलेली नाहीत. त्याच पध्दतीने सुब्रतो राय यांनी शेअर बाजाराचे नियंत्रण करणाऱ्या सेबीचे आदेश पाळले नाहीत. प्रकरण कोर्टात गेले आणि त्यांना अटक झाली. जवळपास तीस हजार कोटी रुपये दंड म्हणून त्यांना रक्कम भरावी लागली. कारण हा सरळ मार्गाने मिळवलेला पैसा नसतो. केवळ कागदांची हेराफेरी किंवा बँकांकडून मिळणारे कर्ज गैरमार्गाने आपल्या खिशात घालण्याचा प्रयत्न केला जातो. केवळ एखादी व्यक्ती दहा दहा हजार कोटींची कर्जे उचलतो. त्यावेळी त्या कर्जामागचा हेतूदेखील तपासला गेला पाहिजे. दुर्दैवाने आपली बँकिंग पध्दतीच सदोष असल्याने देशातल्या श्रीमंतांसाठीच त्यांच्या तिजोऱ्या खुल्या होतात. सामान्य माणूस किंवा परिश्रमाने उद्योग करणाऱ्याला इतक्या सहजासहजी बँका कर्ज देत नाहीत. यावरून त्यांचा हेतूदेखील प्रामाणिक नसल्याचेच सिध्द होते. पैसेवाल्यांच्याच दिमतीला असलेल्या बँकांना पैसेवालेच जेव्हा धोका देतात. तेव्हा सार्वजनिक पैसा लुटला तर जातोच पण बँका आणि हे बडे लोक यांच्यातले हितसंबंधही त्यातून स्पष्ट होतात.

### मुंबई हे आर्थिक केंद्र

ही सगळी उदाहरणे एवढ्याचसाठी महत्त्वाची ठरतात की व्यक्ती, समाज सर्वांच्या व्यवहारासाठी पैसा हा महत्त्वाचा घटक असतो. आणि या पैशाची उपलब्धता प्रत्येकाला त्याच्या गरजेनुसार झाली पाहिजे. म्हणजेच खऱ्या अर्थाने उद्योग व्यवसायाची उभारणी करणाऱ्यांना ही मिळाली पाहिजे. त्याशिवाय आर्थिक संस्थांनी अशाच उद्यमशील लोकांचा शोधही घेतला पाहिजे. दुर्दैवाने बँका पैसा लाटणाऱ्यांनाच कर्जे देण्यासाठी उत्सुक असतात आणि हा दिलेला पैसा परत मिळेल की नाही. याची त्यांनादेखील खात्री नसते. सार्वजनिक पैसा असल्याने तो आला काय आणि गेला काय याची कोणतीही खंत ते बाळगत नाहीत. परंतु कधी ना कधी कुठे ना कुठे परिश्रमाने न कमावलेला म्हणजेच लाटलेला हा पैसा उलटायला सुरुवात होते आणि मग त्याची या ना त्या मार्गाने अनेकांना भरपाई करावी लागते. मुंबई ही तर देशाची आर्थिक राजधानीच आहे. त्यामुळे अशा आर्थिक घोटाळ्यांचेही ते अनेकवेळा केंद्रबिंदूही ठरते. मग नरसिंह राव पंतप्रधान असताना झालेला शेअर बाजार घोटाळा आणि त्यात मरणपंथाला लागलेला हर्षद मेहता अशाच दुसऱ्या घोटाळ्यात अडकलेला केतन पारेख ज्याची अजूनही सुटका झालेली नाही आणि आता विजय मल्ल्या किंवा नीरव मोदींनी केलेली लूटमार त्यांना देश सोडून जायला भाग पाडती झाली.